# अधिसूचना

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१) वि.पा.वि.म.
नागपूर यांचे कार्यालय, नागपूर
दिनांक - १९/०९/२०२५

## भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८

क्र.मं.अ./उजि(भू)/वि.पा.वि.म./कावि-५५६/२०२५, दिनांक - १९/०९/२०२५.

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलमं ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसुल व वनविभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आलेला आहे.) या द्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमिन" असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी, (यात यापुढे ज्याचा निर्देश "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी, आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूची मध्ये कारणे नमुद करावीत) :

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये, पुर्नवसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचिमध्ये तपशील नमुद करावा:)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातुन सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडुन भरपाई दिली जाणार नाही. -

तसेच अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आलेला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी **श्री विशालकुमार मेश्राम, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर** यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूचि-एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव :- गोन्हा, तालुका :- कुही, जिल्हा :- नागपूर,**

**भूसंपादन प्रकरण क्रमांक :- ३/अ-६५/२०२५-२६ प.ह.नं. ६३अ**

| अ.क्र | सर्व्हे क्रमांक | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | ९५/१ | ०.१६ |
| २ | ९८/१/अ | ०.०४ |
| ३ | ४०२/१ | ०.०८ |
| ४ | ५४० | ०.०३ |
| **एकुण** | | **०.३१** |

अनुसूची—दोन

<u>सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण</u>

प्रकल्पाचे नाव :- **गोसीखुर्द प्रकल्प**

प्रकल्पकार्याचे वर्णन :- गोसीखुर्द प्रकल्प बाधित मौजा – गोन्हा ता.कुही जि.नागपूर च्या पुनर्वसनसंबंधी प्रस्तावित जमीन संपादित करण्याबाबत.

समाजाला मिळणारे लाभ :- **<u>गोसीखुर्द प्रकल्प</u>**
पुनर्वसन व सोई सुविधा.

अनुसूची—तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- **विस्थापीत होत नाही.**

## अनुसूची–चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-

भूमि संपादन, -पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १०(क) अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागु करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची–पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाच्या तपशिल

अ. प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम :- निरंक

आ. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

इ. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :- **निरंक**

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर** यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १९/०९/२०२५

ठिकाण :-

(विशालकुमार मेश्राम)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१)
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर